# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

C/o महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (दुसरा व चौथा मजला)
सर्व्हे नं. ८३२-ए, फायनल प्लॉट क्र. १७८ व १७९, बालचित्रवाणी जवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे -०४.
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२३०६६/६७ वेबसाईड – www.mscepune.in ई-मेल mscepune@gmail.com

दरपत्रक सुचना :

जा.क्र. मरापप/भांडार/द.सु/इलेक्ट्रिशियन/२०२५/ 6379
दि. 31/12/2025

प्रति,

-------------
-------------
-------------

विषय : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या पुणे -०४ या कार्यालयासाठी इलेक्ट्रिशियन कामासाठी वायरमन/संस्था व्दारे वार्षिक देखभाल व दुरुस्ती(AMC) सेवा वेळेवर पुरविणेसाठी दरपत्रके मागविणेबाबत.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या स. नं. १७३/बी-१, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे -०४, येथील दोन गोडाऊनचे ठिकाणी व एस.एस.सी. बोर्ड, राज्य मंडळ, पुणे -०४, दुसरा व चौथ्या मजला या ठिकाणी असलेले वीज पुरवठाबाबत देखरेखीसाठी "वायरमन" सेवा पुरविणेस वार्षिक देखभाल व दुरुस्ती(AMC) करुन घेणेस, दुसऱ्यांदा दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

दरपत्रके सादर करताना तांत्रिक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | तांत्रिक कागदपत्रे |
|---|---|
| १. | संस्थातर्फे दरपत्रके सादर करणार असेल तर संस्था स्थापनाबाबत प्राधिकृत सक्षम अधिकारी यांनी दिलेला परवाना<br>किंवा<br>वैयक्तिक वायरमन म्हणून दरपत्रके सादर करणार असाल तर वायरमन प्रशिक्षण घेतलेले प्रमाणपत्र किंवा वायरमन परवाना सादर करावा. |
| 2. | वस्तु व सेवा कर प्रमाणपत्र प्रत सादर करावे किंवा जीएसटी प्रमाणपत्र नसेल तर तसा लेखी अर्ज सादर करावा. |
| ३. | संबंधित जबाबदार व्यक्तीचे आधार कार्ड/पॅन कार्ड |
| ४. | दरपत्रके संस्था सादर करणार असेल तर मागील वर्षाचे ITR प्रत सादर करावे. |

दरपत्रकाचा तपशील

| अ.क्र. | कामाचा तपशील | GST व सर्व कर वगळून मजूरी दर प्रति महिना |
|---|---|---|
| १. | परीक्षा परिषदेचे दुसरा व चौथा मजला तसेच दोन गोडाऊनचे ठिकाणी असलेले विद्युत उपकरणांस होणारा वीज पुरवठा खंडीत झाल्यास/वीज वहनाचा तांत्रिक बिघाड/उपकरणांची वीज जोडणी तात्काळ दुरुस्ती करणे/ उपकरणे बंद पडल्यास त्यामागील कारण सुचविणे, नवीन उपकरणांस वीज पुरवठाची व्यवस्थाचे मजूरी काम करणे/नवीन वीज जोड बोर्डची स्थापनाची मजूरी करणे अशा स्वरुपांच्या कामासाठी एक वायरमन/संस्थाची आवश्यकता आहे. | |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या स्थलांतरित कार्यालयात व गोडाऊनचे ठिकाणी "वायरमन" सेवा पुरवणेसाठी दिनांक ३१/१२/२०२५ ते दि. ०८/०१/२०२६ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत दरपत्रके स्वीकारण्यात येतील. तांत्रिक कागदपत्रे व दरपत्रके एकसाथ एकाचा बंद पाकिटामध्ये आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे -०४ यांचे नावे हस्तपोच द्यावीत. बंद पाकिटावरील भागावर "वायरमन" सेवा पुरविणेसाठीचे वार्षिक देखभाल व दुरुस्ती(AMC) दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख करावा.

उशिरा किंवा ई-मेल व्दारे उपलब्ध झालेली दरपत्रकाचा विचार/स्वीकार केला जाणार नाही. दरपत्रके उघडणे किंवा रद्द करणेचे अधिकार मा. अध्यक्ष यांचे राहतील.

अटी व शर्ती :

१. वरील तांत्रिक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे, तांत्रिक कागदपत्रे सादर न कराण्यारे संस्था/व्यक्तीने सादर केलेल्या दराचा विचार/स्वीकार केला जाणार नाही.

२. परिषदेतील शाखेच्या/विभागाच्या मागणी/आदेशानुसार आपणास काम पूर्ण करावे लागेल.

LETTER

३. आपत्कालीन व्यवस्थेत सेवा पुरवणे शक्य नसल्यास पर्यायी व्यवस्था करावी, तसे परिषदेस लेखी स्वरुपात कळविणे आवश्यक आहे. पर्यायी व्यवस्था केलेल्या संस्थेस देय रक्कम आपणास अदा करावी लागेल. परीक्षा परिषद त्याबाबत देयक अदागयीची कोणती कार्यवाहीस जबाबदार नाही.

४. परिषदेसाठी वेळेत सेवा उपलब्ध न झाल्यास दंड आकारण्यात येईल.

५. इलेक्ट्रिशियनसाठी वायरमन(कुशल/अनुभवी/परवानाधारक) सेवा पुरविणे संस्थेस बंधनकारक राहील. इलेक्ट्रिक कामासाठी लागणारे साधन/सामग्री संबंधित संस्था/वायरमन हे अगोदर सुचवतील त्याप्रमाणे सदर सामग्री परिषदेमार्फत पुरविण्यात येईल.

६. दरपत्रके मागविलेल्या व प्राप्त होणाऱ्या सबबीवर परिषद अभिप्राय देण्यास बांधिल राहणार नाही.

७.न्युनतम प्राप्त होणाऱ्या संस्थेस दरांचे वाटाघाटी करणेसाठी परिषदेत उपस्थित राहणे, रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

८. न्युनतम दर असणारी संस्था सेवा देण्यास नियुक्त झाल्यास, सेवा पुरवणेचे देयक तीन महिने पुर्ण झाल्यानंतर तिमाही हप्त्याने(वार्षिक देखभालीच्या चार समान टप्प्यामध्ये) अदा करण्यात येईल.

९. देयकामध्ये जीएसटी व इतर कर सादर करण्यात आले तर नियमाप्रमाणे देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१०. परिषदेच्या मागणीनुसार सेवा पुरवठा केल्यानंतर देयकाची पडताळणी करुन देयक अदा करण्यात येईल. कामाबाबत कोणतेही आगाऊ रक्कम / Advance Amount परिषद अदा करणार नाही.

११. करारनाम्यातील कामासंदर्भातील अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक राहतील.

१२. दरपत्रके मागविणे अथवा प्राप्त दरपत्रके रद्द करणेचा अधिकार परीक्षा परिषदेचा राहील.

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे – ०४.

LETTER